Vol 6 Issue 10 April 2017

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 10 | APRIL - 2017

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

# स्त्रीगीते : मौखिक सर्जनाचा सांस्कृतिक ठेवा

प्रा. डॉ. जया जितेंद्र कदम
मराठी विभाग प्रमुख, मु. सा. काकडे महाविद्यालय,
सोमेश्वरनगर,बारामती, पुणे.

## प्रस्तावना




स्त्रीगीतांचा विचार करता असे दिसते की, भारताच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या ग्रामीण स्त्रियांनी कधी एकमेकींच्या सहाय्याने काम करता करता तर कधी स्वतःचे मन मोकळे करण्यासाठी स्वतंत्रपणे अनेक गीतांची निर्मिती केली आहे. जी उत्फूर्त आहे. पुरूषी समाजातील दडून राहिलेल्या मौखिक सर्जनाचा तो एक सांस्कृतिक ठेवाच आहे. ही गाणी रचली फक्त बायकांनीच. त्यामुळे लोकसाहित्यनिर्मिती ही स्त्रियांचीच कर्तबगारी आहे असे म्हटले तरी वावगे ठरू नये. कारण बहुसंख्य लोकसाहित्याच्या रचना या अनक्षर, अनाम स्त्रियांनीच केल्याचे दृष्टोपत्तीस येते. त्यांच्या या शब्दनिर्मितीला लिखित वाङ्मयात स्थान नाही. त्यांच्या निर्मितीला समाजाने दुर्लक्षित केले असले तरी, वैचारिक जाणीव व शब्दसंपत्तीच्या बाबतीत विपुलतेची साक्ष या मौखिक परंपरेत असल्याचे प्रत्ययाला येते. त्यामुळेच लोकसाहित्याचे उपासक दत्तो वामन पोतदार या संदर्भात म्हणतात की, ''आमची लोकगीते म्हणजे आमचे वेद आहेत आमच्या लोककथा म्हणजे आमची मानसिक विश्रांती आहे. या कथागीतांच्या श्रवण पठणाने इथला माणूस समृध्द होतो.'' सानेगुरूजींनी तर लोकगीतांचा उल्लेख करताना म्हटले होते की, ''आमच्या वाडवडिलांनी केवळ पाठांतराच्या बळावर जतन केलेली ही संस्कृती जोपासली पाहिजे. ही गीते जनलोकांकडून मिळवून पुन्हा प्रसिध्द करायची म्हणजे समाजमनाचे ऋण फेडायचे म्हणून लोकसाहित्यविषयक ग्रंथ प्रकाशित करणे म्हणजे या ऋणनिर्देशाची दखल घेवून आपल्या संस्कृतीशी इमान राखणे.''

एरव्ही रानामाळात खपणाऱ्या या बायका ठेवणीची लुगडी नेसुन जेव्हा गाऊ, नाचू लागतात. तेव्हा ग्रामीण मातीत रुजलेली लोकसंस्कृती बोलू लागते. इथे लोकजीवन महत्त्वाचे ठरते. थोर विचारवंत प्रभाकर मांडे म्हणतात, ''लोकजीवनाचा संदर्भ सोडून लोकसाहित्याचा अभ्यास करणे म्हणजे भुसा भरलेल्या प्राण्याचे निरिक्षण केल्यासारखे आहे.'' लोकजीवनाचे नाना रंग यातून व्यक्त होतात. स्त्रीगीतातून बोली भाषेचे सप्तरंग शब्दांशब्दातून ध्वनीत होतात. उदा.

''मोत्यांची चुंबळ। तांब्याची घागर
घागर बुडवली। चुंबळ तरंगली
माशांनो, मगरींनो। द्या माझी काढून
जाऊ माझी दलाल। ती मला बोलेलं
जावेची पायरी। कधी मला सुटेल?
बहिण माझी जनाबाई। कधी मला भेटेल?''

या गीतात मुखडा कायम राहतो. छळ करणाऱ्या नात्यांची नावे बदलत राहतात. माणसांपेक्षा मासे, मगर हे निसर्गाचे घटक विश्वासू वाटतात. नणंद, दीर, सासू, सासरा यांचा विवाहितेला होणारा जाच अशा गीतांतून व्यक्त होतो. बायका फुगडी खेळतात. पिंगा घालतात. कोंबडा नाचवतात. सुप घेऊन नाचतात. ती नाचून नाचून दमल्यावर फेर धरुन गाऊ लागतात. श्रमपरिहार हाही यामागे हेतू असू शकतो. प्रा. व. बा. बोधे यांनी अशाप्रकारचे प्रचंड लोकधन आपल्या ग्रामीण साहित्यातून व्यक्त केले आहे. स्त्रीगीतातून कौटुंबिक भांडणाचे पदरही हळुवारपणे उलगडत जातात. सण, उत्सवाच्या निमित्ताने होणारे खेळ, उत्सवनृत्य अशा प्रसंगी बायका गातात. त्यांची लोकगीते कोणत्याना कोणत्यातरी क्रियेशी संबंधित असतात. ग. दि. माडगूळकरांची लोकगीतांच्या अंगाने जाणाऱ्या कवितेतील आई बाळाला झोपवितांना अंगाई म्हणते,

''हलकेच कळ्यांनो उमला
लागली झोप बाळाला।''

ही मांडणी अभिजनांसाठी आहे पण बहुजन समाज लग्नात घाणा भरताना–

''घाणा गं भरीयला
खंडीभर गव्हाचा

मंडप मोतीयाचा
दणका थोर
घाणा गं भरीयला
सव्वाखंडी भाताचा
उंदं गोतायाचा
नवरा बाळ''

नाती समृध्दता हे खेड्यात वैभवाचे लक्षण मानले जाते. ज्याला उदंड नात्याचा गोतावळा तो श्रीमंत. अशी लोकधारणा कधी काळी होती. सातारी बायका कोंबडा फर्मास झुलवतात. देखणी जोडीदारीण निवडतात. उजव्या पायाची तीडी डाव्या पायावर टाकतात. दोन्ही हातांचे पंजे एकमेकांत अडकवून, हात गुडघ्यावर ठेवून जागेवर कोंबड्यासारखे नाचतात आणि कोंबडा गीत गातात.

''तुझ्या कोंबड्याची चोच
माझ्या कोंबड्याची चोच
सभा भरीली। पाटील गावचा राजा
कोंबडा मारील माझा। पाटीखाली डालीला
दाजी दीर नटवा। चांदी सोन्याचा बटवा''

तोंडाने चिरका आवाज काढत, धिम्या लयीत उड्या मारत बायका गातात, नाचतात, आपल्या पोरीबाळींना कोंबडा झुलवायला लावतात. या महिला शेती संबंधित कामात बाराही महिने राबत असतात. शेतीतील पिके, घर, नातेवाईक यांचे संदर्भ सहज येतात. हे ग्रामविश्व मर्यादित असते पण संपन्न असते. अस्सल ग्रामीण बोली भाषेत घडणारा हा लोकगीतांचा आविष्कार मोठा देखणा असतो. सासर आणि माहेर यातील फरक या स्त्रिया किती प्रभावीपणे मांडतात. त्याचं गाणं आणि त्याचं जगणं एकमेकांशी एकरुप झालेलं असतं. खेडूत स्त्रीच्या अंतःकरणत नागर स्त्रीला डोकावता येणे महाकठीण. नागर स्त्रिया सुरक्षित कवचात वावरत असतात. त्यांचे प्रश्न सोडवायला सभोवती स्वयंसेवी संस्था असतात. राबणारी बाई तिचे प्रश्न तीच सोडविते. आई, वडील आणि वाघासारखा भाऊ तिला जवळचा वाटतो. नवऱ्याची हक्काची सावली त्यांना अस्मान बळ देते. फुगडी घालतानासुध्दा किरकोळ कारणासाठी नवऱ्याचा मार खाल्ल्याचे त्या कौतुकाने सांगतात.

''वाटी बाई वाटी
बेसनाची वाटी
नवऱ्यानं मारलं
तंबाखुसाठी।''

लहान पोरीसुध्दा एकमेकींचा कान धरुन 'च्यॉव म्यॉव' खेळतात. त्यांची भाषा मांजराच्या पिल्लासारखी देखणी असते. एकेक शब्दाची दृष्ट काढावी इतके देखणे शब्द असतात.

'आपडी थापडी
गुळाची पापडी
तेलंगीचं एक पान
धर गं बेबी ह्योच कान।'' किंवा
''च्यॉव ऽऽ म्यॉव ऽऽ
पखालीचं पाणी प्यॉव ऽऽ''

अशा बालगीतांचा कर्ता कोण हे सांगणं कठीणं, सगळी लोकगीतेच अपौरुषेय. स्त्रीजीवनाची मोहुन टाकणारी भावरम्यता यात दिसते. साने गुरुजींनी 1930 साली लोक गीतांचे संकलन केले. वामनराव चोरघडे, काका कालेकर यांनी 'लोकसाहित्याचे मूलधन' गोळा केले. 1944 साली कलाबाई देशपांडे यांनी या 'अपौरुषेय वाङ्मय' ग्रंथाला हात घातला. मराठवाड्यात नांदापूरकरांनी लोकगीते संकलनाची चळवळ गतिमान केली. भारतीय साहित्याला त्यांनी 'मराठीचा आहेर' दिला. मराठीतील स्त्रीधन गोळा करण्यात डॉ. सरोजिनी बाबर यांनी हयात वेचली. 'लोकसाहित्याची रुपरेखा' दुर्गा भागवतांनी मांडली. रविंद्रनाथ टागोर यांचा 'लोकसाहित्य' हा ग्रंथ संकलनकरांची प्रेरणा ठरली. इरावती कर्वे, दुर्गाबाई भागवत यांनी आपल्या लोकसाहित्य संशोधनाला मानवशास्त्र व समाजशास्त्र यांची बैठक दिली.

अनेक स्त्रीगीते तशी आजही दुर्लक्षितच आहेत. पूर्वी नागपंचमीला तर मुली चार–चार मुलींचे दोन गट करत. आमने सामने चाळीस फुटाचं अंतर ठेवून हे गट उभा राहत. एक घोळका पळत–पळत गाणं म्हणत हात नाचवत यायचा आणि म्हणायचा,

''झकुट बाई झकुट बाई झकुटनीबाई
काखेला कळशी आणि देशमुखींन बाई''
मग दुसरा घोळका पळत यायचा आणि हात उंचावत म्हणायचा,
''झकुट बाय झकुट बाय झकुट बाय
घागऱ्याचं पातळ आणि गुजरीन बाय''

अशी गाण्याची चाल एकच राहायची. फक्त जातीची नावे बदलत जात. काही पोरी तशीच वेशभूषा करुन येत असत. लहान पोरीही मोठ्या पोरीकडुन प्रेरणा घेत आणि खेळ खेळत डोळे वटारुन पोरी एकमेकींना विचारत–

''माझ्या वाघाला भेशील काय?
शेळपट मेंढरु नेशील काय?

अशी लोकगीते रचना सौष्ठवाच्या दृष्टीने ओवीजवळ जाणारी आहेत. या गीतांना लय आहे, ताल आहे, अस्सल बोली भाषेची खुमारी आहे.

''आठशे खिडक्या नऊशे दार
कोण्या दरवाजाने गेली ग नार
जोडवी घालून झाली तयार
कोण्या दरवाजान गेली ही नार''

असा एक एक दागिणा बाईच्या अंगावर चढत राहतो आणि गीत पुढे सरकत राहते. 1955 ते 65 या दरम्यान खेडयात गावागावात हे गीत गायले जायचे. आता नवे संगीतकार दिग्दर्शक या लोक गीतांचे नुतनीकरण करुन पैसे कमवू लागले आहेत. थोडी मलमपट्टी करुन ही मंडळी आपल्या नावावर पारंपरिक लोकगीते खपवितात. डॉ. सरोजिनी बाबरांनी अनेक देवदेवतांची गीते गोळा केली आहेत. 'एक होता राजा' या पुस्तकात त्या गीतांचा समावेश ही केला आहे. तुळजापुरची अंबा हे लोकगीत या दृष्टीने उत्तम आहे. डॉ. सरोजिनी बाबर यांच्या 'एक होता राजा' या पुस्तकात सौ. कुमंदिनी पवार, चंद्रकांत विवरे, गो. ल. जमदाडे, सौ. लिलाराजे पटवर्धन, बाबासाहेब देसाई यांनी संग्रहित केलेली अनेक गीते आहेत. तुळजाभवानी, अंबामाता, यल्लमा या देवीची गीते जशी उपलब्ध आहेत तशी धनगर, पोतराज, वासुदेव, गोंधळी, वाघ्या मुरळी यांची गीतेही उपलब्ध आहेत. श्री. रा. श्री. कदम या तडवळे गावातील सदगृहस्थाने गोळा केलेली वाघ्या मुरळीची गाणी अफलातून आहेत. हा मौल्यवान खजिना आहे. लोकजीवनाशी एकरुप झालेली लोकगीते स्त्रियांच्या ओठां ओठांवर असतं. आता लोकसंस्कृतीचा संबंधच लोकजीवनाशी उरला नाही. लोकगीतांबद्दलची काही निरीक्षणे नोंदवतांना थोर समीक्षक डॉ. मनोहर जाधव म्हणतात. 'लोक गीतांमध्ये स्त्रीगीतांचे प्रमाण विपुल आहे. ते इतके विपुल आहे की स्त्रीगीते म्हणजेच लोकगीते असेही म्हणता येऊ शकेल. सर्वसाधारण कष्टकरी वर्गातील स्त्रिया आपल्या मनोवेदना, मनोभावना लोकगीतातून व्यक्त करताना सखीजवळ, समवयीन स्त्रियांजवळ किंवा समूहरुपाने व्यक्त करतात. या समवयीन स्त्रिया अर्थातच समदुःखी असतात. जात्यावरील ओव्या किंवा तत्सम प्रकारातून गायिली जाणारी लोकगीते देखील स्त्रीमनातील आत्मभावना प्रकर्षाने अभिव्यक्त करतात.'' (मौखिकता आणि लोकसाहित्यः संपादकः मधुकर वाकोडे | सुषमा करोगल पृष्ठ क्र. 139)

डॉ. राजेंद्र माने यांनी 'लोकसंस्कृतीचा गाभारा' या आपल्या ग्रंथात स्त्रीलोकगीतांचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला आहे. लोकगीतांबद्दल ते म्हणतात, ''आम्ही खेड्यात असताना जुन्या जाणत्या स्त्रियांकडून अनेक लोकगीतं ऐकलेली आहेत. बऱ्याच वेळा या बायका त्यांची वैयक्तिक दुःखं गाण्यात ओवायच्या. कदाचित अशा प्रकारच्या प्रकटणामुळं त्यांचं ते दुःख हलकं होत असलेही. जगण्यात असलेल्या अनेक नात्याचं वर्णन त्यात यायचं नाही. नवरा, भाऊ, मैत्रीण, आई, सासू... कोणतं नातं त्यातून सुटायचं नाही. त्या गायला लागल्या की त्यांचा जणू तो छंदच बनायचा. सादाला प्रतिसाद मिळल्याप्रमाणे एकीनंतर दुसरी गायला लागायची. हा सगळा त्यांच्या प्रसन्न हृद्याचा एक आविष्कार असायचा. ओवी नुसती ऐकायची नसते. तर ती गायची सुध्दा असते. या सगळ्या लोकगीतांमधल्या ओव्यांकडे पाहिलं, की जाणवतं संगीतातले सगळे प्रकार जणू यात सामावलेत. सगळे राग आळवले गेलेत. एक अत्यंत सुंदर नाद ब्रम्हच या ओव्यांनी निर्माण केलंय. लोकगीतं हा ग्रामीण स्त्रियांच्या सुखदुःख प्रकटीकरणातून निर्माण झालेला मनोहारी छंद आहे. असं म्हटलं तरी वावगं होणार नाही.''जात्यावरची ओवी डॉ. माने यांनी संकलीत केली आहे. त्यासाठी जाणकरांच्या ग्रंथांचाही आधार घेतलाय. पूर्वी मुलींचा विवाह त्यांच्या मर्जीनुसार नव्हे तर आईवडिलांच्या मर्जीनुसार व्हायचा. खात्यापित्या दारी पोरगी दिली जायची. याला सातारी भाषेत 'गंडा बघून गाय बांधणे' असं म्हणत. बहिणीची ख्याली खुशाली विचारायला भाऊ गेला की बहिणीला अस्मान ठेंगणं व्हायचं. पण सासुरवास असल्याने वाघासारख्या भावाची उठाठेव करताना तिला वेदना असह्य होतात. तिला भावासाठी काहीच करता येत नाही. काळजाचा ठोका चुकविणरी ही वेदना असायची. यल्लमाची भक्त असणारी जोगती आणि जोगतीण नृत्य करत लोकगीते गातात. गळ्यात एकवीस कवड्यांचा गाठा घालुन या देवदासी वावरतात. कवडी हे योनीचे प्रतीक. जोगतीनी या देवदासीच. हादग्याची गीतेही डॉ. राजेंद्र माने यांनी संकलीत केली. पाटावर हत्तीचं चित्र काढून पोरी त्यावर फुलं वाहतात. गोल रींगन करुन गाणी गातात. याला हादगा म्हणतात. हस्त नक्षत्रात हत्तीचा पाऊस धो–धो पडतो. म्हणून याच नक्षत्रात पोरी हादग्याची गाणी गातात. उदा.

''ऐलमा पैलमा गणेश देवा
माझा खेळ मांडून दे करीन तुझी सेवा''

यांना धर्मगीते म्हटलं तरी काही बिघडणार नाही. हादग्याची गाणी सर्वदूर सारखीच दिसतात. लोकगीत हे अलिखित अक्षरवाङ्मय आहे. ते समूहमनाचे शास्त्र असते. लोकगीते ही लोकांनी लोकांसाठी व लोकभाषेत निर्माण केलेली आहेत. मौखिक स्वरूपात जतन केलेले हे धन एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पंरपरेने चालत आलेले आहे. अशी ही स्त्रियांची गीते. पुरुषांपेक्षा महिला जास्त संवेदनशील असतात. नातेसंबंध, ईश्वरी अस्तित्वाच्या पाऊलखुणा त्या मनापासून जपतात. श्रध्दा फार लवकर महिलांच्या मनात वारुळ करते. सुख अथवा दुःख गीतात लयबध्द चालीत व्यक्त करणे हा स्त्रीस्वभाव. परिणामी लोकगीतांचा प्रांत पुरुषांपेक्षा स्त्रियांनी व्यापला आहे हे मान्य करावचे लागेल. त्यामुळेच डॉ. मनोहर जाधव यांनी 'लोक गीतांमध्ये स्त्रीगीतांचे प्रमाण विपुल आहे. ते इतके विपुल आहे की स्त्रीगीते म्हणजेच लोकगीते असेही म्हणता येऊ शकेल.' अशी जी शक्यता व्यक्त केली. ती शक्यता नाही तर वास्तव आहे असेच वाटते.

*संदर्भ ग्रंथः–*

1.लोकसाहित्य : शब्द आणि प्रयोग, डॉ. साहेब खंदारे, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
2.एक होता राजा– डॉ. सरोजिनी बाबर, महाराष्ट्र शासन प्रसिद्धी संचालनालय, प्र. आ. 1965.
3.मुरळी – प्रा. व. बा. बोधे. मेनका प्रकाशन पुणे. प्र. आ. 1984.
4.लोकसंस्कृतीचा गाभारा – डॉ. राजेंद्र माने, अक्षरयात्रा प्रकाशन, प्र. आ. 2009
5.मौखिकता आणि लोकसाहित्य – संपादक मधुकर वाकोडे,सुषमा करोगल, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. 2001
6.स्त्रीवादी संकल्पना आणि मराठीतील स्त्रीवादी साहित्य विशेषांक, विचार भारती, जून–जुलै 2004
7.सातारी बोलीचा सांस्कृतिक आविष्कार, डॉ. जया जितेंद्र कदम, अक्षरबंध प्रकाशन, नीरा.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org